मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक २५ जानेवारी २०२४ । पान १

# पुण्यात दिसेल तिकडे मराठा वादळ!

## प्रचंड प्रतिसादामुळे पदयात्रा तब्बल नऊ तास लेट



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सुरू असलेली पदयात्रा अजूनही पुणे शहरातील शिवाजीनगर परिसरात आहे. पदयात्रा मार्गावर पुढे आणि मागे लांब पर्यंत मराठा बांधव दिसत आहेत. या प्रतिसादामुळे या पदयात्रेला सुमारे नऊ तास विलंब झाला आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबई शहरात होणाऱ्या उपोषणाला जरांगे पाटील व लाखो मराठा बांधव जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून २० जानेवारी रोजी मुंबईकडे निघाले आहेत. ही पदयात्रा मंगळवारी (दि. २३) दुपारी पुणे जिल्ह्यात दाखल झाली. बुधवारी (दि. २४) ही पदयात्रा पहाटे खराडी येथून निघाली. (उहळपलहुरव)खराडी येथून पुढे नगर रोडने गुंजन चौक - पर्णकुटी चौक - तारकेश्वर चौक - सादलबाबा चौक - संगमवाडी - संचेती चौक - सिमला ऑफिस चौक - सुर्यमुखी दत्तमंदिर चौक - विद्यापीठ चौक - औंध रोडने सरळ राजीव गांधी पुल असा पुणे शहरातील पद्यात्रेचा मार्ग होता. बुधवारचा मुक्काम लोणावळा येथे होणार आहे. पदयात्रेत लाखो मराठा बांधव सहभागी झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यातील मराठा बांधव पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातून पदयात्रेत सहभागी होणार आहेत. पदयात्रा बुधवारी सकाळी नऊ ते दहा वाजता शिवाजीनगर येथे पोहोचणे नियोजित होते. मात्र ठिकठिकाणी होणारे स्वागत आणि मराठा बांधवांची अलोट गर्दी यामुळे ही पदयात्रा धीम्या गतीने पुढे जात आहे. पदयात्रा बुधवारी दुपारी १२ वाजता सांगवी फाटा येथे पोहोचणे अपेक्षित होते. मात्र आता पदयात्रा रात्री नऊ पर्यंत सांगवी फाटा येथे पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पाच तास ही पदयात्रा शहरातील वेगवेगळ्या मार्गावरून भक्ती शक्ती मार्गे मुंबईच्या दिशेने जाणार होती. मात्र आता पदयात्रेला मध्यरात्र होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे. पिंपरी चिंचवड शहरातून पुढे जुन्या पुणे मुंबई महामार्गाने देहूरोड - तळेगाव - वडगाव - कामशेत मार्गे लोणावळा येथे ही पदयात्रा मुक्कामासाठी जाणार आहे. पदयात्रेला मिळत असलेल्या प्रतिसादामुळे वाहतूक पोलिसांनी पदयात्रेच्या मार्गावरील वाहतूक वळवली आहे. वाहतूक कोंडीत कडकायला नको म्हणून अनेकांनी बुधवारी घरातून बाहेर पडणे टाळले आहे. तर अनेक कंपन्यांनी पदयात्रेच्या पार्श्वभूमीवर घरून काम करण्याची मुभा दिली आहे. जरांगे पाटील यांच्या स्वागतासाठी अनेक मराठा बांधव पुणे मुंबई महामार्गावर सकाळपासून उभे आहेत.



# वाकडच्या आरएमसी प्लँटमुळे हवा, ध्वनीचे प्रदूषण

## महापालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाकड येथील इंदिरा कॉलेज रस्त्यावर असलेल्या आरएमसी प्लँटमुळे परिसरात हवा व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे, नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी स्थानिक सोसायटीधारकांकडून केली जात आहे. दरम्यान, याबाबत, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे रहिवाशांनी तक्रार नोंदवली होती. त्यावर, काही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असून, कारवाई करण्याबाबत सूचना केल्या आहेत. शनी मंदिर, इंदिरा कॉलेज रस्ता परिसरात रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लँट आहेत. या भागात



मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य असते. परिसरात शाळा, कॉलेज आणि रहिवासी क्षेत्र असल्यामुळे विद्यार्थी, नागरिकांना श्वसनाचा त्रास होत आहे. तसेच हवेच्या शुद्धतेवरही परिणाम होत आहे. या भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहने आणि आरएमसी ट्रक रहदारी करीत आहेत. या वाहनांकडून कोणत्याही वाहतूक नियमांचे पालन केले जात नाही. वेगावर नियंत्रण नसल्यामुळे अनेकदा अपघाताची परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळे, पदाचारी आणि प्रवाशांना धोकादायकपणे प्रवास करावा लागतो. विशेष म्हणजे, या भागातील बहुतेक आरएमसी प्लँट दिवसाचे २४ तास कार्यान्वित असतात. रात्री-अपरात्री वाहनांची वर्दळ आणि प्लँटमधील मशीनचा मोठा आवाज सुरू असतो. हवा प्रदूषणासोबतच ध्वनी प्रदूषण हा सुद्धा कळीचा मुद्दा बनला आहे. महापालिका प्रशासनाने या गंभीर समस्येबाबत तात्काळ चौकशी करावी. नागरी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक कार्यवाही करावी. स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांच्या हिताच्या दृष्टीने कायमस्वरूपी ठोस उपाययोजना कराव्यात. प्रदूषणमुक्त परिसर आणि वाहतूक कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध करुन द्यावेत, अशी आग्रही मागणी रहिवाशांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सोसायटीधारकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन दिले आहे. त्यावर, आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

> “माझी काल आयुक्त शेखर सिंह यांच्याशी याविषयावर चर्चा झाली. ताथवडे भागातील आरएमसी प्राधान्याने हटविण्याबाबत आयुक्तांनी तात्काळ कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे. काशिनाथ गुरव आणि ताथवडे परिसरातील रहिवाशांनी यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे खरोखर कौतुक वाटते.
>
> **- दत्तात्रेय देशमुख,** अध्यक्ष पिंपरी हौसिंग सोसायटी फेडरेशन

> “शहरातील नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण याबाबत महापालिका प्रशासनाने सतर्क असले पाहिजे. रहिवासी क्षेत्रातील आरएमसी प्लँटमुळे स्थानिक नागरिकांना ध्वनी आणि हवा प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. वाहतूक समस्याही वाढलेली आहे. यावर प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी स्थानिक सदनिकाधारकांची मागणी आहे. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना लेखी निवेदनही दिले आहे. या प्रश्नासंदर्भात तात्काळ कारवाई करावी, अशी आमची आग्रही मागणी आहे.”
>
> **- सचिन लोंढे,** उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन

# विचारी मनुष्यच समाजात नक्की परिवर्तन घडवून आणू शकतो : सौंदणकर

## स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महावितरणच्या ग्रंथालयात पुस्तकं भेट

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त वीज कर्मचारी अभियंता सेनेचे प्रादेशिक सल्लागार संतोष सौंदणकर यांच्या पुढाकारातून पुण्यातील रास्ता पेठ मुख्य कार्यालयातील महावितरण च्या ग्रंथालयासाठी पुस्तके भेट देण्यात आले. यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार व औद्योगिक संबंध अधिकारी पुणे




शिरीष काटकर, वीज कर्मचारी अभियंता सेनेचे प्रादेशिक अध्यक्ष मनोहर शिंदे व सुरज भराटे आदी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सांस्कृतिक पटलावर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांचा पडलेला प्रभाव अतुलनीय आहे. असंख्य लोकांच्या हृदयात त्याच्या पाउल खुणा दडलेल्या आहेत. त्या खुणा कुठलीही शक्ती मिटवू शकत नाही. त्यांचे विचार नेटाने आणखी पुढच्या पिढीला सुपूर्द करायचे आहेत. पुस्तक वाचून मनुष्य आणखी विचारी बनतो. विचारी मनुष्यच समाजात नक्कीच परिवर्तन घडवून आणू शकतो, असे मत यावेळी संतोष सौंदणकर यांनी व्यक्त केले. महावितरण च्या ग्रंथालयासाठी पुस्तके भेट दिल्याबद्दल ग्रंथालय प्रशासनाने संतोष सौंदणकरांचे आभार मानले.

# निवडणूक लढवणं हा आपला मार्ग नाही

## मनोज जरांगे यांच्या दिंडीच्या मार्गात करण्यात आला बदल

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारीपासून जालना येथील आंतरवली सराटी येथून मोर्चाला सुरुवात केली असून शुक्रवारी (२६ जानेवारी) मुंबईतील आझाद मैदानात हा मोर्चा दाखल होणार आहे. तर पुण्यातील वाघोली येथून मनोज जरांगे पाटील यांच्या हजारोंच्या संख्येने मराठा बांधव सहभागी असलेल्या मोर्चाला आज सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली आहे. मनोज जरांगे यांचे ठिकठिकाणी स्वागत केले जात आहे. तर यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांसोबत संवाद देखील साधला.मनोज जरांगे पाटील यांनी आगामी लोकसभा निवडणुक लढवावी आणि त्यांनी काही उमेदवार देखील उभे करावे, अशी चर्चा सुरू झाली आहे. त्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील म्हणाले की, निवडणुक लढवणं हा आपला मार्ग नाही. मराठा



समाजाला आरक्षण मिळावं, हाच आपला, माझा उद्देश आहे. राजकारण म्हटलं की, फोडाफोडीच आलीच, त्यामुळे आपलं समाजकारण सुरू ठेवायचं आणि जोपर्यंत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत लढा सुरू ठेवायचा अशी भूमिका त्यांनी मांडली. तुमचा जालना ते मुंबई असा मोर्चाचा मार्ग असून आता पुण्यात काही मिनिटांत तुम्ही दाखल होणार आहात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होणार आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले की, शहर असो की ग्रामीण भाग, मराठा समाजातील लेकरांसाठी हा मोर्चा काढला आहे. आम्ही तुम्हाला त्रास व्हावा म्हणून चाललो नसून एक दिवसासाठी शहरातून जात आहोत, त्यामुळे तुम्ही एक तांब्या भरून पाणी दिलं पाहिजे. तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत जाऊन आमरण उपोषण करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ज्या कोणी नेत्यांनी विश्वासघात केला आहे. त्या नेत्यांची नावे मुंबईत गेल्यावर जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी काढलेली पदयात्रा बुधवारी शहरात दाखल झाली. पदयात्रेमुळे नगर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. पर्यायी मार्गांवर वाहतूक कोंडी झाली. नगर रस्त्यासह, येरवडा, बंडगार्डन रस्ता, संचेती पूल, गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनचालकांना मनस्ताप सोसावा लागला. पदयात्रा बुधवारी पहाटेच्या चारच्या सुमारास नगर रस्त्यावरील खराडी-वाघोली भागात दाखल झाली. हजारो मराठा बांधव पदयात्रेत सहभागी झाले होते. पदयात्रेत सहभागी झालेले ट्रक, टेम्पो, जीप अशी वाहने घेऊन सहभागी झाले होते.पदयात्रेतील वाहनांची रांग आठ ते दहा किलोमीटरपर्यंत जाऊन पोहोचली होती. पदयात्रेत मोठ्या संख्येने वाहने सहभागी झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे नगर रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला होता. नगर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. जरांगे यांच्या पदयात्रेचा पुणे शहरातील मार्ग नगर रस्ता, येरवडा, सादलबाबा चौक, संगमवाडी पूल, संचेती चौक, वेधशाळा चौक, गणेशखिंड रस्ता, औंध असा निश्चित करण्यात आला होता. दुपारी साडेतीनच्या सुमारास पदयात्रेतील सहभागी झालेल्या मराठा बांधवाचा पहिला जथ्था संचेती चौकात दाखल झाला. त्यानंतर या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. नगर रस्त्यावरील वाहतूक सकाळी सातनंतर बंद करण्यात आली होती. त्यामुळे या भागातील शासकीय कर्मचारी, खासगी कंपनीतील कर्मचाऱ्यांनी बुधवारी सुट्टी घेतली. नगर रस्ता परिसरातील शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती.

### दिंडीच्या मार्गात बदल

» मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात बीडहून मुंबईकडे निघालेली पायी दिंडी आज सकाळी पुणे शहरात पोहोचली. या दिंडीचे सगळ्या ठिकाणी अतिशय जोरदार स्वागत करण्यात आले. ठीकठिकाणी फुलांची उधळण करून मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यात आले. या यात्रेला पुण्यात अलोट गर्दी झाली आहे. यामुळे होणारी वाहतूक कोंडी आणि गैरसोयीचा विचार करता, पुणे पोलिसांनी जरांगे पाटलांना या दिंडीचा मार्ग बदलण्याची विनंती केली आहे. जरांगे यांनीही ही विनंती मान्य केल्याने दिंडीच्या मार्गात अंशत : बदल करण्यात आला आहे.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारीपासून जालना येथील आंतरवली सराटी येथून मोर्चाला सुरुवात केली तर पुण्यातील वाघोली येथून मनोज जरांगे पाटील यांच्या हजारोंच्या संख्येने मराठा बांधव सहभागी असलेल्या मोर्चाला आज सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली आहे.

# रोहित पवारांची ११ तासांनंतर ईडी चौकशी संपली

## ही लढाई संपलेली नसून अशीच सुरू राहणार : रोहित पवार

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

ॲग्रो कारखान्यात झालेल्या कथित गैरव्यवहारप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पवार यांची आज सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) तब्बल ११ तास चौकशी झाली. ११ तास ईडीला सहकार्य केल्यानंतर रोहित पवारांनी राष्ट्रवादी भवनच्या खिडकीतून उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित केलं. तसंच, त्यानंतर पत्रकारांशीही संवाद साधला. ही लढाई संपलेली नसून अशीच सुरू राहणार असल्याचं, ते यावेळी म्हणाले. ईडीकडून ११ तास चौकशी झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. त्यावेळी रोहित पवार म्हणाले, ही लढाई संपलेली नाही. ही लढाई पुढेही अशीच सुरू राहणार आहे. त्यामुळे माझ्यासाठी तब्बल १२ तास येथे जमललेल्या माझ्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो.८४ वयाच्या युवारोबर आपण एकजुटीने




लढत आहोत. असे असंख्य हजोर नागरिक, कार्यकर्ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात येण्याचा प्रयत्न करत होते. पोलिसांनी अडवलं असेल. पण काही हरकत नाही. सर्व प्रेमानेच येथे येत होते. मी सहकार्य करत होतो, सहकार्य करत राहणार आहे. अधिकाऱ्यांची चूक नसते. त्यांनी जे विचारलं ते दिलं आहे. यापुढेही सहकार्य असंच राहील. तिथं जेव्हा सहकार्य करत होतो, १२ तास चौकशी चालू होती. अनेक लोक थकतात, घाबरतात, कळत नाही काय करायचं. पण तिथे बसलो होतो तुमच्या सर्वांचा आवाज माझ्या कानापर्यंत पोहोचत होता. माझ्या प्रेमापोटी येथे येऊन घोषणा देत होतात, लढत होतात. हे माझ्या कानावर येत होते. त्यातून मला प्रेरणा मिळत होती, असं रोहित पवार म्हणाले.तुम्हाला एक गोष्ट जाणवली का. जेव्हा एखादा कार्यकर्ता अडचणीत येतो, आपल्या विचारांचा आमदार अडचणीत येतो, त्याच्यावर अन्याय होतो, असं लाडक्या नेत्याला कळालं तेव्हा शरद पवार १२ तास बसले. आज ११ तासांची चौकशी झाल्यानंतर रोहित पवारांना पुन्हा १ फेब्रुवारी रोजी चौकशीकरता बोलावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. या चौकशीकरता ईडीकडून अतिरिक्तम माहिती मागवण्यात आली आहे. ही अतिरिक्त माहिती दिली जाणार आहे, असं रोहित पवार म्हणाले. ते म्हणाले, मी आधी व्यवसायात आलो. नंतर राजकारणात आलो. जो व्यवसाय केला तो प्रामाणिकपणे केला.

# अजितदादांनी दरडावूनही घोळ संपेना!

## ससून मद्य पार्टी प्रकरणी चौकशी समितीवर आता नेमली 'चौकशी'

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ससून रुग्णालयात निवासी डॉक्टरांनी ३१ डिसेंबरला केलेल्या मद्य पार्टीची छायाचित्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे दाखवून वाभाडे काढले होते. या प्रकरणी रुग्णालय प्रशासनाने चौकशी समिती नेमली होती. या समितीने अहवाल सादर केल्यानंतर आता पुन्हा चौकशीसाठी उपसमिती नेमण्याचा निर्णय रुग्णालय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे ओल्या पार्टीची चौकशी लांबत चालल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ससूनमध्ये काही निवासी डॉक्टरांनी ३१ डिसेंबरला मद्य पिऊन गोंधळ घातला होता. त्यात अस्थिव्यंगोपचार विभागातील तीन निवासी डॉक्टरांचा समावेश होता. या डॉक्टरांनी मद्य पिऊन शेजारील निवासी महिला डॉक्टरांच्या खोलीच्या दरवाजाची काच फोडली होती. या प्रकरणी एका निवासी महिला डॉक्टरने तक्रार केली होती. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने १ जानेवारीला नेत्रविकार विभागाच्या प्रमुख डॉ. संजीवनी आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमली. या समितीने मागील आठवड्यात चौकशी करून अहवाल अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्यासमोर सादर केला, अशी माहिती सूत्रांनी दिली.या अहवालावर बी.जे. वैद्यकीय मह ाविद्यालयाच्या पदव्युत्तर शिक्षण समितीसमोर चर्चा झाली. या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष अधिष्ठाता असतात. या समितीने घटनेच्या वेळचे रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यानंतर संबंधित निवासी डॉक्टरांचीही समितीने चौकशी केली. मात्र, दोषींवर नेमकी काय कारवाई करावयाची याबाबत समितीचे एकमत झाले नाही. याचबरोबर चौकशी अहवालाबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे या प्रकरणी उपअधिष्ठाता डॉ. मुरलीधर तांबे यांच्या नेतृत्वाखाली उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय रुग्णालय प्रशासनाने घेतला. आता ही उपसमिती आधीच्या चौकशी अहवालाची तपासणी करून कारवाईबाबत शिफारस करणार आहे. त्यावर अधिष्ठाता कारवाईचा अंतिम निर्णय घेतील, असे सूत्रांनी स्पष्ट केले.ससूनमध्ये काही निवासी डॉक्टरांनी ३१ डिसेंबरला मद्य पिऊन गोंधळ घातला होता. त्यात अस्थिव्यंगोपचार विभागातील तीन निवासी डॉक्टरांचा समावेश होता. या डॉक्टरांनी मद्य पिऊन शेजारील निवासी महिला डॉक्टरांच्या खोलीच्या दरवाजाची काच फोडली होती. या प्रकरणी एका निवासी महिला डॉक्टरने तक्रार केली होती. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने १ जानेवारीला नेत्रविकार विभागाच्या प्रमुख डॉ. संजीवनी आंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमली. या समितीने मागील आठवड्यात चौकशी करून अहवाल अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्यासमोर सादर केला, अशी माहिती सूत्रांनी दिली.या अहवालावर बी.जे. वैद्यकीय महा विद्यालयाच्या पदव्युत्तर शिक्षण समितीसमोर चर्चा झाली.






> **"ससूनमधील ३१ डिसेंबरच्या घटनेप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीने अहवाल सादर केल्यानंतर त्याबाबत काही प्रश्न उपस्थित झाले. आता या प्रकरणी उपसमिती नेमण्यात आली असून, ती आधीचा चौकशी अहवाल तपासून कारवाई करण्याबाबत अहवाल सादर करेल. त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.**
>
> **-डॉ. विनायक काळे,**
> **अधिष्ठाता, ससून रुग्णालय**

# पुणे-मिराज रेल्वे अधिक वेगानं धावणार

## मिरज-सांगली दरम्यान दुहेरीकरणाचं काम पूर्ण

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणेकरांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. पुणे-मिरज रेल्वेमार्गाचं काम पूर्ण झालेय. निरीक्षण झाल्यानंतर या मार्गावर अधिक वेगाने रेल्वे धावतील. मिरज, सांगलीवरुन पुण्याला येणाऱ्या लोकांचं प्रमाण मोठं आहे. त्याशिवाय पुण्यातील लोकांचाही तिकडे जाण्याचा कल जास्त असतो. त्यामुळे पुणे-मिरज असा प्रवास करणाऱ्यांसाठी ही दिलासादायक वृत्त आहे. सध्या सांगली आणि मिरजदरम्यान इंटरलॉकिंगचं काम यशस्वी झालेय. पुणे - मिरज या मार्गाचं आता निरीक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतर रेल्वेसाठी हिरवा कंदील दिला जाईल. या मार्गावर आता रेल्वेची चाचणी होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मिरज या मार्गाचं दुहेरीकरण झाल्यामुळे आधीपेक्षा जास्त वेगाने आता रेल्वे धावतील.पुणे-मिरज रेल्वेमार्गाच्या लांबी २७९.५ किमी इतकी आहे. या मार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सांगली आणि मिरज स्टेशनदरम्यान अंतिम टप्प्यात आलेय. दोन्ही स्टेशनमधील इंटरलॉकिंगचं काम पूर्ण झाल्यानंतर मध्य रेल्वे सुरक्षा आयुक्त जनक कुमार गर्ग याचं निरीक्षण करतील. त्यानंतर रेल्वे ट्रॅफिकसाठी मंजूरी दिली जाणार आहे. पुणे-मिरज या मार्गावर रेल्वे आता प्रति तास ११७ किमी वेगानं धावेल. दुहेरी मार्गावरुन रेल्वेवाहतूक सुरू झाल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी, व्यापारी, नोकरदारांसाठी गतीमान प्रवासाची सोय होणार असून परिसरातील अर्थविकासाला चालना मिळेल. रेल्वेच्या एका अधिकाऱ्याने सोमवारी दिलेल्या माहितीनुसार पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचं काम मध्य रेल्वेच्या पुणे विभागामार्फत सुरु करण्यात येणार होतं. मध्य रेल्वेचे उच्च अधिकारी रामकरण यादव यांच्या नेतृत्वात सांगली-मिरज यामधील दुहेरीकरणाचं काम पूर्ण झाले आहे. या मार्गाची लांबी ९.४८ किंमी इतकी लांब आहे. दुहेरीकरणाच्या कामासाठी २५० कर्मचारी राबलेत. पुणे- मिरज रेल्वेमार्गाच्या दुसऱ्या मार्गिकेची एकूण २८० कि. मी. पैकी पुणे जिल्ह्यातील बाधित लांबी ३५ कि.मी. इतकी आहे. यासाठी जिल्ह्यातील १४ गावातील एकूण १८ हेक्टर जमिनीची आवश्यकता होती. यात पुरंदर तालुक्यातील आंबळे, बेलसर, धालेवाडी, दौंडज, पिंपळे खुर्द, वाल्हा, पिसुर्टी, थोपटेवाडी, जेजुरी ही ९ गावे, हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, फुरसुंगी आणि वळती ही तीन तर दौंड तालुक्यातील डाळींब आणि ताम्हणवाडी या दोन गावांचा समावेश आहे.भूसंपादन करण्यात आलेल्यापैकी १३.१० हे. आर ही खासगी जमीन होती. तर ०.३४७५ हे. आर सरकारी जमीन तर ४.५५ हे. आर वनजमीन हस्तांतरीत करण्यात आली.